# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

**(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५, बुधवार, दिनांक २ जुलै, २०२५ व गुरूवार, दिनांक ३ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री विक्रम काळे, श्रीकांत भारतीय, कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री किशोर दराडे, इद्रिस नायकवडी, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, पंकज भुजबळ, डॉ.परिणय फुके, सर्वश्री हेमंत पाटील, किरण सरनाईक, राजहंस सिंह, रणजितसिंह मोहिते-पाटील, दादाराव केचे, सदाशिव खोत, संजय केणेकर, अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंत खंडेलवाल, विक्रांत पाटील, संदीप जोशी, योगेश टिळेकर, धर्मगुरु राठोड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू)**

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकांशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठया शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची

अप्रकाशित प्रत

तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळयाचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्हयातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाडयांचा पुर्नविकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतराराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**तीन : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री. विक्रांत पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल येथील सेक्टर-१ ते ११ मधील असलेल्या १५०० हुन अधिक गृहनिर्माण सोसायट्यांचा पुनर्विकास करण्यास सिडकोचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी तसेच जमिनींचा असलेला भाडेपट्टा करार करण्यास अडचणी निर्माण होत असल्याची बाब उघडकीस येणे, सन १९९० ते २००० या काळात सिडकोने सध्या पनवेल महानगरपालिका हद्दीत समाविष्ट असलेल्या नवीन पनवेल मधील सेक्टर क्र. १ ते ११ येथे बंगलो प्लॉट नियोजित करून पुढे त्याच ठिकाणी स्वतःच्याच भूमिकेत बदल करून आवश्यक असलेली सी.सी., ओ.सी. तसेच अन्य परवानग्या देऊन या सर्व सेक्टरमध्ये १५०० हुन अधिक बहुमजली इमारत उभारण्यास मान्यता देणे, सद्यःस्थितीत १ ते ११ सेक्टरमध्ये १५०० हुन अधिक गृहनिर्माण सोसायट्यांची स्थापना झालेली असून याठिकाणी एक लाखाहून अधिक रहिवासी वास्तव्यात असणे, येथील अनेक बहुमजली इमारती धोकादायक असून पनवेल महानगरपालिकेकडून रहिवाशांना घर खाली करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्यानंतर धोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांनी पुनर्विकास करण्यासाठी सदरचे प्लॉट गृहनिर्माण संस्थेच्या नावाने हस्तांतरित करून भाडेपट्टा करार करावा व पुनर्विकास करण्यासाठी "ना-हरकत प्रमाणपत्र" द्यावे अशी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे निवेदनाद्वारे व प्रत्यक्ष भेटून वारंवार करण्यात आलेली मागणी, परंतु बंगलो प्लॉटच्या ठिकाणी बंगलोच बांधता येतील अशी सिडकोची कठोर भूमिका, लाखो रहिवाशांच्या मनात सिडको विषयी निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, शासनाने सेक्टर १ ते ११ मधील नागरिकांना आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या सिडकोकडून मिळवून देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. अंबादास दानवे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"धनदा कॉर्पोरेशन ही मुंबई शेअर बाजारात नोंदणीकृत कंपनी असून, छत्रपती संभाजीनगर येथील VITS हॉटेल ही तिची महत्वाची मालमत्ता असणे, काही भागधारकांनी प्रशासनावर दबाव टाकून MPID कायद्यांतर्गत कारवाईस

अप्रकाशित प्रत

प्रवृत्त केलेले असणे, सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकरणांत MPID कायदा लागू होत नाही, असे तोंडी निरीक्षण नोंदवलेले असणे, तरीही उपविभागीय अधिकाऱ्यांनी काही भागधारकांशी हितसंबंध ठेऊन हॉटेलची किंमत जाणीवपूर्वक कमी दाखवून लिलाव प्रक्रियेस प्रारंभ केलेला असणे, हॉटेल व्यवसायातून ६ कोटींचा नफा जमा असूनही कर्मचारी पगार व BSE शुल्क थकित ठेवलेले असणे, कोणताही न्यायालयीन आदेश नसताना दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ पासून हॉटेल बंद केल्यामुळे १५० कामगार व छोटे व्यावसायिक अडचणीत आलेले असणे, कंपनीने नव्या भागधारकांच्या मदतीने पुनरुज्जीवनाचा निर्णय घेतलेला असतांना लिलाव प्रक्रियेने त्यात अडथळे निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर भागधारक व कामगारांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या भूमिकेची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.चंद्रकांत रघुवंशी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"तळोदे (जि.नंदुरबार) शहराचा सन १९६५ मध्ये सिटी सर्व्हे पार पडलेला असूनही आजपर्यंत त्या सर्व्हेचे प्रत्यक्ष अंमलबजावणीचे काम झालेले नसणे, देशातील जहागिरी खालसा होऊनसुद्धा तळोदे शहरात जहागिरी पद्धत अद्याप चालू असणे, परिणामी नागरिकांना त्रास सहन करावा लागणे, कब्जेदार असतानाही मालकी हक्काची नोंद जमीन धारक नागरिकांच्या नावावर नोंदले जात नसणे, नागरिकांच्या मालमत्ता या जहागिरदारांचा नावावर सातबाराच्या उताऱ्यावर दाखवले जात असणे, त्यामुळे कब्जेदारावर जमिनीच्या कामाबाबत अथवा घराच्या नुतनीकरणासाठी जहागिरदाराकडून पैशांची मागणी करण्यात येणे, नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल), भु-संपत्ती हक्क, शासकीय कर्ज योजना, मालमत्ता कर भरणा, घरपट्टी यांसारख्या योजनांचा थेट लाभ मिळत नसणे, शहरातील अनेक रहिवाशी वर्षोनुवर्ष त्या जमिनीवर राहून ही कायदेशीर मालकी हक्कापासून वंचित राहणे, ही बाब अन्यायकारक असून नागरी विकासाच्या अडथळ्याचे मुख्य कारण ठरत असणे, परिणामी रहिवाशांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत तात्काळ जहागिरी हक्क रद्द करून सिटी सर्व्हेच्या आधारे रहिवाशांच्या मालकी हक्कांची नोंद करून प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.दादाराव केचे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"आर्वी (जि.वर्धा) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सह सचिव पद

अग्रिम प्रत

एकाकी असल्याने पदोन्नतीने व बिंदूनामावली प्रमाणे भरणे आवश्यक असताना नियमबाह्यपणे भरणे, पणन संचालकाची परवानगी न घेताच धर्मकाटा जवळील जागा दीर्घ मुदतीवर कृषक शिक्षण संस्थेला लिजवर देणे, बाजार समितीने केलेल्या बांधकामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असणे, समिती सभापती कापूस व्यापाऱ्यांना ३०% बाजार फी आकारून ७०% व्यापाऱ्यांना सूट देऊन रोखीने आर्थिक लाभ मिळवणे, समिती रेकॉर्डला कापूस खरेदी कमी दाखवून गैरव्यवहार करणे, लिलाव शेड बांधकामात कंत्राटदाराला रु.१० लक्ष अतिरिक्त प्रदान केल्याबाबत समितीचे लेखापरीक्षणामध्ये नमूद असणे, सह कास्तकारी खरेदी-विक्री संस्थेच्या मालकीची तसेच खांडसरी साखर कारखान्याची खुली जागा पेट्रोल पंप, मंगल कार्यालयासाठी जागा कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता दीर्घ मुदतीवर लीजवर देणे, शेतकरी सहकारी जिनिंग प्रेसिंगची अमरावती रोड लगत असलेल्या जागेवर शासनाची परवानगी न घेता दुकानाचे बांधकाम करणे, एकच कर्मचारी दोन ठिकाणी कार्यरत दाखवून त्याला नियमबाह्य वेतनाचा लाभ देणे, शेतकऱ्यांचे व सह संस्थेचे हित न जोपासता भ्रष्टाचाराची, नियमबाह्य कामे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती करीत असल्याने या तिन्ही संस्थेच्या भ्रष्टाचाराची अनियमिततेची चौकशी करून दोषींविरुद्ध कारवाई करून कृषी उत्पन्न बाजार समिती आर्वी बरखास्त करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री सुनिल शिंदे, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, डॉ. मनिषा कायंदे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वाडा तालुक्यातील (जि.पालघर) वडवली येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत जुने टायर जाळून त्यापासून ऑईलची विक्री मोठ्या प्रमाणात होत असून टायर रिसायकलिंग करणाऱ्या कंपन्यांमुळे वाडा परिसरातील नागरिक मागील तीन वर्षापासून कारखान्यांतून होणाऱ्या प्रदूषणामुळे त्रस्त असून वडवली गावाच्या हद्दीत असलेले दहा प्रदूषणकारी कारखाने पालघर जिल्हा पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार बंद करण्यात आले असणे, संबंधित कारखान्याच्या मालकांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून कारखाने पुन्हा रात्री सुरू केल्याचे तेथील ग्रामस्थांना माहे जून मध्ये निदर्शनास येणे, वाडा परिसरात दररोज प्रदूषित रासायनिक सांडपाणी नैसर्गिक नाल्यात टाकल्याने दूषित पाण्यामुळे नाल्यातील मासे तसेच जनावरे मृत्युमुखी पडल्याच्या घटना

समोर येणे, याबाबतीत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अनेकदा पत्रव्यवहार करूनही त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने रिसायकलिंग कारखान्यांच्या प्रदूषणामुळे स्थानिक नागरिकांना श्वसन विकाराचा त्रास सहन करावा लागून रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होणे, एम.डी. पायरोलिसेस या कंपनीत माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये स्फोट होऊन या स्फोटात संपूर्ण कंपनी जळून खाक होऊन त्यामध्ये दोन कामगारांचा व त्यांच्या दोन मुलांचा बळी गेल्याची घटना उघडकीस येणे, ग्रामस्थांकडून कारखान्यांवर कारवाई करण्याची मागणी होत असतांना प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने परिणामी शासनाप्रति निर्माण झालेली चिडीची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**चार : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**पाच : शासकीय विधेयक —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**सहा : (गुरूवार, दिनांक ३ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजित वंजारी, सचिन अहिर, अशोक उर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६०**

अमुद्रित प्रत

**अन्वये प्रस्ताव —**

राज्यातील शेतकऱ्यांना सतत नैसर्गिक आपत्ती, बाजारातील अस्थिरता, अपुरा हमीभाव, बोगस बियाणे-खते, अपूर्ण नुकसान भरपाई, अपुरा कर्जपुरवठा आणि कर्जमाफीच्या अंमलबजावणीत होत असलेले दुर्लक्ष यामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणे, कृषी उत्पन्न बाजार समित्यांची संख्या वाढविण्याची गरज असूनही नवीन समित्यांची स्थापना झालेली नसणे, ‘AI आधारित कृषी धोरण’ आणि ‘मागेल त्याला सौर कृषी पंप’ योजना केवळ घोषणापुरत्याच राहिल्या असणे, ‘शेतकरी ओळख क्रमांक’ बंधनकारक करून अनेकांना योजनांपासून दूर ठेवले जात असणे, खते निरिक्षकांच्या अधिकारात ६० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला असल्याने बोगस बियाणे आणि खते यामध्ये मोठ्या प्रमाणावर फसवणूक वाढल्याने सदरहू निर्णय रद्द करण्याची आवश्यकता, आत्महत्याग्रस्त कुटुंबांना वेळेवर मदत मिळत नसणे, कामगार क्षेत्रात श्रम कायद्यांमधील बदल, बोगस लाभार्थी, योजनांमधील अनियमितता आणि गिग व प्लॅटफॉर्म कामगारांसाठी कोणतेही कायदेशीर संरक्षण नसणे, अनेक पारंपरिक आणि असंघटित कामगार विमा, निवृत्ती वेतन व सुरक्षा सुविधा यांपासून वंचित असणे, शालेय शिक्षण विभागात शासकीय शाळांची दुरवस्था, पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षक भरतीतील दिरंगाई, अकरावी प्रवेश प्रक्रियेमधील गोंधळ, आणि बोगस शालार्थ आयडी वापरून अपहार होत असणे, मुंबईत धारावी पुनर्विकास प्रकल्पात अदानी समूहाला दिलेल्या सवलती, एमएमआरडीए च्या प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता, गिरणी कामगारांच्या पुनर्विकासात झालेली फसवणूक, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

सात **अशासकीय ठराव :-**

**(मंगळवार, दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —**

(१) **श्री.जयंत आसगांवकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७७**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता

विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६०**

"शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४९**

"राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ जुलै, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानपरिषद